● गुरुवार, दि. २४ ऑक्टोबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ९१ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जनसहृदय हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## विधानसभा मतदार संघासाठी ५ उमेदवारांचे ६ अर्ज दाखल

**जालना । प्रतिनिधी -** विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील ९९- परतूर, १००-घनसावंगी, १०१-जालना, १०२- बदनापूर (अ.जा.) आणि १०३-भोकरदन या पाच विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीसाठी आज ३ उमेदवारांनी ३ नामनिर्देशन अर्ज दाखल केले आहेत. त्यामुळे आजपर्यंत एकुण ५ उमदवारांचे ६ नामनिर्देशन अर्ज स्विकारण्यात आले असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली आहे.

९९-परतूर, १०१-जालना आणि १०३-भोकरदन या तीन विधानसभा मतदार संघासाठी आज कोणीही अर्ज दाखल केला नाही. बुधवार दि. २३ ऑक्टोबर, २०२४ रोजी १००-घनसावंगी मतदारसंघासाठी ज्ञानेश्वर प्रतापराव पवार (अपक्ष) यांनी तर १०२- बदनापूर विधानसभा मतदारसंघासाठी चाबुकस्वार राहुल निरंजन (अपक्ष) आणि मगरे भाऊसाहेब भागाजी (अपक्ष) यांनी प्रत्येकी एक नामनिर्देशन अर्ज दाखल केले आहे. याप्रमाणे आज तीन नामनिर्देशन अर्ज दाखल केले असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली.

आजपर्यंत एकूण २६१ इच्छुक उमदवारांना ६४७ नामनिर्देशन अर्जाचे वितरण करण्यात आले आहे. संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र दाखल करुन घेतले. उमेदवारांना मंगळवार, दि. २९ ऑक्टोबर पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ ते ३ यावेळेत आपले नामनिर्देशन पत्र सादर करता येणार आहे. बुधवार, दि. ३० ऑक्टोबर, २०२४ रोजी नामनिर्देशन पत्रांची छानणी करण्यात येणार असून, सोमवार, दि. ४ नोव्हेंबर, २०२४ पर्यंत उमेदवारांना आपले अर्ज मागे घेता येणार आहे. तर बुधवार, दि. २० नोव्हेंबर, २०२४ रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी मतदान होणार आहे. या निवडणूकीचा निकाल शनिवार दि. २३ नोव्हेंबर, २०२४ रोजी जाहिर केला जाणार आहे.

युवा आदर्श

### झुकते माप ...

समोरच्या पक्षाला
द्यायचे झुकते माप
योग्य राखू संतुलन
मन ठेवायचे साफ
पक्ष श्रेष्ठी दूरान्वेषी
विचार हो टापोटाप
कानखरे कृतिशील
बोलायची नसे टाप
सन्मान सांभाळता
गिळंकृत तो संताप
पक्षश्रेष्ठी चाणाक्षता
उजळू जाय महताप
सन्मान मित्रपक्षांचा
नको लपवलेलेपाप
उदिष्ट शर संधानार्थ
वेळेवरती ओढे चाप
कठीण बनते काम
विस्तारे जेंव्हा व्याप
कार्यकर्ते विम्जीकल
निस्तरे सारे उपद्व्याप
करसे सांभाळू पक्षांस
शांत करी मनस्ताप
पक्षात पाडी खिंडार
काही अंतस्थ प्रताप

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## विधानसभा निवडणुक २०२४; जालना काँग्रेसने कंबर कसली!



# गद्दारांचा पंचनामा

### सरकारचे घोटाळे, खोके सरकारचे रेटकार्ड, महागाई, जीएसटीची तफावत, महिला अत्याचार...

**दीपक शेळके**

**जालना-** राज्यात महायुतीचे सरकार आल्यापासून अदाणी-अंबानी ग्रुपला फायदा देण्यात आला आहे. अनेक उद्योगधंदे गुजरातला पळविले आहेत. क्राईम वाढले आहे. महिला सुरक्षित नाहीत, बदलापूरच्या घटनेत आरोपीला केवळ मागच्यांची नावे बाहेर येवू नयेत म्हणून मारले, तसेच निवडणुका तोंडावर असल्याचे पाहून महिलांच्या खात्यात पैसे टाकले असल्याचा आरोप काँग्रेस पक्षाचे निरीक्षक डॉ. पी.सी. शर्मा यांनी महायुती सरकारच्या निर्णयांची व कारभाराची चिरफाड येथे केली आहे. ते जालना शहरातील एका हॉटेलमध्ये बुधवार (दि २३) रोजी दुपारी आयोजित एका पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी त्यांनी लोकसभेप्रमाणेच विधानसभेतही राज्यात महाविकास आघाडीला यश मिळणार असून आगामी सरकार महाविकास आघाडीचे स्थापन होणार असल्याचा दावाही त्यांनी यावेळी केला. या पत्रकार परिषदेला खा. डॉ. कल्याण काळे, कैलास गोरंट्याल, राजाभाऊ देशमुख, राजेंद्र राख, शेख महेमुद आदींची उपस्थिती होती. प्रसंगी गद्दारांचा पंचनामा या पत्रकाचे विमोचन करण्यात आले.

डॉ. शर्मा म्हणाले की, राज्यात मोठा भ्रष्टाचार झाला आहे. एकीकडे लुटायचे व दुसरीकडे वाटायचे असा आरोपही त्यांनी महायुती सरकारवर लावला आहे. महागाई वाढली आहे. शेती मालालाा भाव नाही. केवळ अडाणी व अंबानी यांना फायदा हे सरकार पोहचवत आहे. या सरकारने उद्धव ठाकरे व शरद पवार यांचे पक्ष फोडले, चिन्ह चोरले आहे. हे सरकार केवळ लुटणारे सरकार आहे. महिलांच्या खात्यात या सरकारने पैसे टाकले आहे मात्र, वित्त विभागाकडुन याच्यासाठी कुठलीही तरतुद केली नाही. केवळ निवडणुका डोळ्यासमोर ठेवून लोकसभेत झाले ते हाल होऊ नये म्हणून महिलांना आकर्षित करण्यासाठी ही योजना आणली आहे. महाराष्ट्राची जनता समजदार आहे लोकसभेत त्यांनी महायुतीच्या सरकारला नाकारुन महाविकास आघाडीला भरभरुन प्रतिसाद दिला असाच प्रतिसाद विधानसभा निवडणुकीतही राज्यातील जनता देणार असून आगामी सरकार हे महाविकास आघाडीचे स्थापन होणार असल्याचा दावा त्यांनी यावेळी केला. तसेच या निवडणुकीत वरिष्ठ पातळीवरुन बारिक लक्ष ठेवण्यात येत असून निवडुन येणाऱ्या उमेदवारांनाच उमेदवारी देण्यात येणार आहे. त्यासाठी पक्षाने मला निरीक्षक म्हणून पाठविले असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

खा. डॉ. कल्याण काळे म्हणाले की, महाराष्ट्रात शेतकऱ्यांचे हाल झाले आहेत, शेतीमालाला भाव नाही, येथे दररोज जवळपास ७ शेतकरी आत्महत्या करताहेत. यास केवळ महायुती सरकार कारणीभूत असल्याचे म्हणून हे घोटाळाबाजांचे सरकार असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. सौर उर्जा प्रकल्पासाठी येथे एक-एक कोटींचे अनुदान देण्यात येत आहे. मात्र, त्यासाठी अट आहे, कि देशातूनच यासाठी खरेदी केली पाहीजे, परदेशातून खरेदी केल्यास अनुदान मिळणार नाही. आणि हे सर्व अडाणी ग्रुपचे आहे. म्हणजे अनुदान केवळ अदाणी ग्रुपला फायदा पोहचविण्यासाठी असल्याचा गंभीर आरोप त्यांनी यावेळी येथे केला आहे. राज्यात नुकत्याच म्हणजे गेल्या महिनाभरात चार मंत्रीमंडळाच्या बैठका झाला या बैठकांमध्ये जे निर्णय झाले त्या निर्णयास वित्त विभागाची



मान्यताच नाही, आचारसंहिता लागण्यापुर्वी घाईघाईने निर्णय घेतल्या गेले आहेत. अर्थ खात्यात तरतुद केलेली नाही. दीड हजार रुपये लाडक्या बहिणींना दिले आणि चाळीस रुपये गोडतेलावर वाढविले. छत्रपती शिवाजी महाराजांची शपथ घेतली पण अरबी समुद्रात एक साधी विटही अद्याप लावली नाही. या सरकारने छत्रपतींचा अवमान केला आहे. राज्यात महिला सुरक्षित नसल्याचेही डॉ. काळे म्हणाले. जालना शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या घाणेवाडीच्या सांडव्यासाठी पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांना पैसे मागितले असता त्यांनी दिले नसल्याने जालनेकरांच्या पाण्याचा प्रश्न अद्यापही बिकट आहे. जालन्याचा विस्तार झपाट्याने होत आहे. जालना आणि छत्रपती संभाजीनगर मार्गावर वाहतुक वाढली आहे. सध्याचा रस्ता छोटा पडतो आहे त्यामुळे जालना-संभाजीनगर लोकल ट्रेन सुरु होण्याची गरज असल्याचेही त्यांनी यावेळी म्हटले आहे. महायुती सरकारने राज्याला लुटण्याचे काम केले असून त्यांच्या कामाचा चिरफाड गद्दाराचा पंचनामा यात केलेला आहे. हे मतदारांमध्ये पोहचवून आपण समाजप्रबोधन करावे अशी विनंती खा. डॉ. काळे यांनी उपस्थित पत्रकारांना यावेळी केली.

राजाभाऊ देशमुख यांनी महाविकास आघाडीकडुन प्रकाशित करण्यात आलेल्या गद्दारांचा पंचनामा याची सविस्तर माहिती दिली. मोदी-शहा दबाव तंत्र, पैशाच्या जोरावर महाविकास आघाडीचे सरकार घालवून महायुतीचे सरकार स्थापन करून येथील उद्योगधंदे गुजरातला पळविले असल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला.

**गद्दारांचा पंचनाम्यातील ठळक मुद्दे ...**

महाराष्ट्र धर्म बुडवला, गुजरात चरणी अर्पण केला, हे महायुतीचे महापाप...


महाराष्ट्राचे दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यात भ्रष्टाचार करणाऱ्यांना धडा शिकवूया...


फुले शाहू आणि आंबेडकरांचा अपमान करणाऱ्या गद्दारांना महाराष्ट्रातून हद्दपार करूया....

महाराष्ट्रात महिलांवर अत्याचार, लेकी बाळी सुरक्षित नाहीत, हे महायुतीचे महापाप चला त्यांना घडा शिकवूया....

शेतमालाला हमीभाव अन् पीकविमा ही मिळत नाही. शेती अवजारांवर ॠद्ध लावून शेतकऱ्यांना आत्महत्या करायला भाग पाडणाऱ्या सत्ताधाऱ्यांना अद्दल घडवूया....

महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला पळवून युवकांचा रोजगार हिरावून घेणाऱ्यांना जागा दाखवूया....




### महायुती सरकारचे घोटाळे

१ लाख कोटींचा धारावी अदानी घोटाळा, १६ हजार कोटींचा एमएमआरडीए टेंडर घोटाळा, दहा हजार कोटींचा जलयुक्त शिवार घोटाळा, आठ हजार कोटींचा रुग्णवाहिका घोटाळा, ६ हजार साठ कोटी रुपयांचा इलेक्टोरल बॉण्ड घोटाळा, सहा हजार कोटींचा मुंबई रस्ते काँक्रिटीकरण घोटाळा३ हजार दोनशे कोटींचा सार्वजनिक आरोग्य विभागाचा घोटाळा, आठ लाख ६२ हजार उमेदवारांवर परिणाम करणारा तलाठी घोटाळा...

### खोके सरकारचे रेट कार्ड

आमदार खरेदीसाठी ५० कोटी, नगरसेवक खरेदी १ कोटी, वरिष्ठ अधिकारी बदली १ कोटी, जिल्हा सिव्हील सर्जन बदली २५ लाख, एक्साईज इन्सपेक्टर परीक्षेचा पेपर १५ लाख, तलाठी पेपर १५ लाख, कनिष्ठ अभियंता पद १० लाख, गट ड सरकारी नौकरी ७ लाख असे रेट कार्ड असल्याचा आरोप गद्दारांच्या पंचनाम्यात असून यास खोके सरकारचे रेट कार्ड म्हटल्या गेले आहे.

श्रीमंतांच्या गाडीखाली गरिबांना चिरडणाऱ्या खोके सरकारला उघडे पाडूया....

महाराष्ट्र सरकारची तिजोरी लुटून प्रत्येक कामात ३० टक्के कमिशन घेणाऱ्या टक्केबाज सत्ताधाऱ्यांचे पितळ उघडे पाडूया....

पेपर फोडून कंत्राटी भरती करून तरुणांचे आयुष्य उध्वस्त करणाऱ्यांची पोलखोल करूया...

पेट्रोल-डिझेल-गॅस, तेल-तिखट-मीठ, महाग करून सामान्य जनतेचे कंबरडे मोडणाऱ्या सरकारला सत्तेतून हद्दपार करूया...

आदिवासी भागासवर्गीयांना उध्वस्त करून त्यांच्या मुलांना उपाशी ठेवणाऱ्या अन्यायकारी सरकारला जागा दाखवूया....

उद्योगपतींच्या फायद्यासाठी वाढवण बंदर निर्मिती करुन मच्छीमार बांधवांचा व्यवसाय उध्वस्त करणाऱ्या सरकारला सत्तेतून उलथून टाकूया....

घोषित निधी न देता मराठवाड्याला दुष्काळाच्या खाईत लोटणाऱ्यांचा बंदोबस्त करूया...

जाती-धर्मात भांडण लावून महाराष्ट्रात दंगली घडवणाऱ्या, महाराष्ट्र अस्थिर करणाऱ्या दंगलखोर सरकारला तडीपार करुया...

चला गद्दारांचा पंचनामा बघूया...

**दिल्ली दरबाराने महाराष्ट्र धर्माचा कडेलोट केला**

छत्रपती शिवाजी महाराजांची मोदींशी तुलना हा तर महाराजांचा सन्मान असे शिवद्रोहीं वक्तव्य करून भ्रष्टयुतीने महाराजांचा अपमान केला.

टॅक्स स्वरुपात भरलेल्या दर १०० रुपयांमागे केंद्राकडून महाराष्ट्राला फक्त ७ रुपयांची भिक

माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारीने राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले आणि शिवरायांचा अपमान करुन महाराष्ट्रद्रोह केला; त्याला भाजप नेत्यांनी हसून-टाळ्या वाजवून दाद दिली.

**सावकारांचे सरकार**


भ्रष्टयुतीच्या आशीर्वादाने श्रीमंत बापाची मुलं गरिबांना गाडी खाली चिरडून निर्दोष सुटतात.

पुजा खेडकरचे होतात भलतेच लाड, महायुती येतेय स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या स्वप्नांच्या आड

महायुतीने धारावीकरांची घरे हिंसकवून घेतली, सगळी धारावी लाडका मित्र **पान २ वर**

# बदनापूर शिवसेनेच्या वतीने अर्जुनराव खोतकर यांचा सत्कार

**जालना । प्रतिनिधी -** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जालना विधानसभा मतदारसंघातून शिवसेना उपनेते, माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांना आठव्यांदा उमेदवारी जाहीर केली. बुधवारी ( ता. २३)



मुंबई येथे ए. बी फार्म आणि मुख्यमंत्र्यांचे आभार मानण्यासाठी जात असतांना अर्जुनराव खोतकर यांचा बदनापूर विधानसभा शिवसेनेच्या वतीने समृद्धी महामार्गावर अकोला निकळक शिवारात जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांच्या नेतृत्वाखाली जंगी सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर ,युवा सेना सचिव अभिमन्यू खोतकर, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शहर प्रमुख विष्णू पाचफुले, उपजिल्हाप्रमुख गणेश सुपारकर, माजी नगरसेवक राहुल हिवराळे, मेघराज चौधरी,अल्पसंख्यांक शहर प्रमुख जफर खान, युवा सेना तालुकाप्रमुख ईश्वर पाटील झुंबड, अकोल्याचे सरपंच उपतालुकाप्रमुख महादू गीते, युवा सेना शहर संघटक अमोल दाभाडे ,शहर प्रमुख कैलास खैरे ,सोशल मीडिया तालुकाप्रमुख देवा ढाकणे, सरपंच विलास सावंत, कंडारीचे सरपंच भरत खाडे, रामेश्वर दराडे ,भगवानराव ढाकणे ,कैलास पालवे ,अण्णासाहेब तांबे ,समाधान मुंडे ,शरद गीते ,निवृत्ती राजे ,दत्ता तांबे, कृष्णा ढाकणे, ज्ञानेश्वर दराडे, बालाजी शिंदे यांच्यासह अकोला निकळक, भराडखेडा ,कंडारी, रामखेडा बदनापूर येथील ग्रामस्थ, पदाधिकारी, शिवसैनिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# टोकवाडी येथील दलित कार्यकर्त्यांचा भाजपामध्ये प्रवेश




**परतूर । प्रतिनिधी -** आपण केलेल्या सर्वसामान्य जनतेच्या सेवेमुळेच दलित पीडित शोषित या सह सामान्य नागरिकांचा आपल्यावर विश्वास असल्याने, भारतीय जनता पार्टीमध्ये रोज असंख्य कार्यकर्ते दाखल होत असल्याचे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी सांगितले

ते सातोना तालुका परतुर येथे टोकवाडी तालुका मंठा येथील कार्यकर्त्यांच्या प्रवेश सोहळ्याप्रसंगी बोलत होते

पुढे बोलताना माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की, सर्वसामान्य नागरिकांसाठी असलेल्या विविध योजनांचा व्यक्तिगत लाभ त्या त्या व्यक्तीपर्यंत शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी आपण नियमितपणे प्रयत्नांची पराकाष्टा करीत आलेलो आहोत त्यामुळेच तळागाळातील सर्वसामान्य नागरिकांचा आपल्यावर विश्वास असून या विश्वासाच्या बळावरच सर्वसामान्य जनता आपल्या पाठीशी खंबीर असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी सांगितले

यावेळी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर व भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत आनंद जाधव जनार्धन वायाळ सोनाजी जाधव कृष्णा जाधव भगवान लहाने यांच्या पुढाकाराने अनेक युवकांनी व जेष्ठ नागरिकांनी भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला प्रवेशामध्ये टोकवाडी गावचे उपसरपंच मल्हारी प्रधान विकास राठोड विनोद आढे नारायण आढे अंबादास राठोड बाळू राठोड राजेश राठोड संतोष राठोड सुरेश राठोड जानकीराम राठोड गुलाब आढे मनापासून भाऊराव राठोड संजय राठोड भारत राठोड संपत चव्हाण ज्ञानेश्वर राठोड राहुल कांबळे अशोक चव्हाण बाबासाहेब प्रधान महादेव प्रधान विशाल प्रधान भीमराव चव्हाण तुळशीराम प्रधान विकास कांबळे राजेश जाधव अशा असंख्य कार्यकर्त्यांनी यावेळी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला यावेळी

विलास भाऊ आकात बबनराव आकात निवृत्ती राव लाटे सरपंच विकासराव खरात शिवाजीराव घनवट परमेश्वरराव आकात बाबासाहेब आकात रोहन आकात सय्यद भाई गुलाबराव आकात शाहूराव आकात जफर पठाण भगवानराव आकात यासीन भाई यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये जालना जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी करण्यात आली आहे, असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी गणेश महाडिक यांनी जारी केले आहेत.

संपूर्ण जालना जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश दि. २२ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १० वाजेपासून ते दि. ४ नोव्हेंबर २०२४ रोजीच्या २४ वाजेपर्यंत लागू राहील. या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत बाळगता येणार नाही. व्यक्तीचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अधिकारी- कर्मचाऱ्यांना लागू राहणार नाही, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# हातात तलवार घेवुन दहशत पसरविणारा ईसम स्थानिक गुन्हे शाखेच्या ताब्यात



**जालना । प्रतिनिधी -** शहरातील माळीपुरा भागात तलवाल घेऊन दहशत माजविणाऱ्या एका ईसमास जालना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले आहे. त्याच्या कडुन एक धारदार तलवार जप्त करण्यात आली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, शहरात अवैद्य धारदार शस्त्रे बाळगणारे ईसमांची माहिती घेवुन कारवाई करण्याच्या सुचना पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या होत्या. त्यानंतर स्थागुशाचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांनी स्थागुशाचे पथक तयार करुन कारवाई करण्याबाबत मार्गदर्शन केले.

गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीवरून मंगळवार (दि २२) रोजी ईसम नामे अशरफ उर्फ बाबा ईब्राहीम खान (वय ४२, रा. माळीपुरा जुना जालना) हा माळीपुरा भागातील अण्णाभाऊ साठे चौक परिसरात तलवाल घेऊन फिरत असून लोकांमध्ये दहशत पसरवित आहे. या माहितीवरून संबंधीत ईसमाचा शोध घेतला त्यांच्या ताब्यातून रु दोन हजार रुपये किमतीची धारदार तलवार जप्त करण्यात आली आहे. पोलीस हेकॉ(१११७) आडेप यांच्या फिर्यादीवरून कदीम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सपोनि योगेश उबाळे, पोउपनि राजेंद्र वाघ, पोहेकॉ सॅमुअल कांबळे, लक्ष्मीकांत आडेप, रमेश राठोड, सुधीर वाघमारे, सतिष श्रीवास, कैलास चेके आदींनी केली आहे.

## पेवो येथे सब स्टेशनसह अनेक ठिकाणी एमव्हीए ट्रान्सफार्मर मंजुर;

# वीजेचा प्रश्न मार्गी लागणार - लोणीकर

**परतूर । प्रतिनिधी -** परतुर विधानसभा मतदारसंघ हा बागायती पट्टा असल्याने परतूर विधानसभा मतदारसंघातील मंठा परतूर व जालना तालुक्यातील नेर सेवली सर्कल मधील अनेक शेतकऱ्यांच्या विजेच्या बाबतीत अनेक तक्रारी शेतकऱ्यांनी माझ्या कडे केल्या होत्या. याच अनुषंगाने आपण अनेकदा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या कडे मी केलेल्या पाठपुराव्याला यश आल्याने आर डी एस एस योजनेतुन परतूर विधानसभा मतदार संघात मंठा तालुक्यातील पेवा येथे ३३/११ के व्ही नवीन सब स्टेशन मंजूर झाले असून नेर विडोळी तळणी लोणी श्रीष्टी आणी सेवली या सहा ठिकाणी येथे पाच पावर क्षमतेचे एम व्ही ए ट्रान्सफार्मर मंजूर झाले आहे. यामुळे परतुर विधानसभा मतदारसंघातील मंठा परतूर व जालना तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतीला २४ तास वीज उपलब्ध होणार असून गावागावातील खेड्यापाड्यातील तांडे वाड्या वस्तीवर २४ तास वीज उपलब्ध असेल. आर डी एस एस योजने अंतर्गत विजेचे पोल व नवीन डिप्या उभारणी करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. या आर डी एस एस योजने करिता महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी परतुर विधानसभा मतदारसंघातील मंठा व परतुर तालुक्यासाठी प्रत्येकी ८० कोटी रुपये एवढा निधी उपलब्ध करून दिला असल्याची माहिती महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी आज आपल्या भाषणात दिली. ते बदलापूर येथील वरद मंगल कार्यालयात आयोजित भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत असताना बोलत होते. पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की मुख्यमंत्री




लाडकी बहीण योजनेत परतुर तालुक्यात एकूण ४९३७० मंठा तालुक्यात ४६,७५० तर जालना तालुक्यातील नेर व सेवली सर्कल १४६०० अशा परतूर विधानसभा मतदारसंघातील ११०७२० महिला लाभार्थ्यांच्या बचत खात्यात ८३ कोटी ४ लाख रुपये जमा झाले असून महाराष्ट्र सरकारने या योजने करिता चाळीस हजार कोटी रुपये ची आर्थिक तरतूद केलेली असल्याने विरोधकांनी योजना बंद होणार असल्याच्या कितीही वावड्या उठवल्या तरी ही मात्र मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना बंद होणार नसल्याचे यावेळी आवर्जून आमदार लोणीकर यांनी नमूद केले. या प्रसंगी भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश सचिव राहुलभैय्या बबनराव लोणीकर, भाऊसाहेब कदम हरिरामजी मानेे, गणेशराव खवणे, शत्रगुण कणसे, संपत टकले, माऊली शेजुळ, विकास पालवे, शरद पालवे, जिजाबाई जाधव, प्रकाश टकले, शहाजी राक्षे, अंकुशराव कदम, संभाजी वारे, नरसिंग मामा राठोड, महेश पवार, मोहन आढे, दिगंबर मुजमुले गीताराम हजारे, गजानन उफाड, कल्याणराव कदम रावसाहेब राठोड, सुरेश आडे, लहू आडे, नंदू घोडे, मेराज खतीब, मनोज देशमुख यांच्यासह हजारो कार्यकर्त्यांची प्रमुख उपस्थिती होती.

# ॲड. महेश भताने यांची महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या कायदेशीर सल्लागारपदी नियुक्ती

**मुंबई -** महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेत ॲड. महेश भताने यांची कायदेशीर सल्लागार म्हणून नियुक्ती झाली आहे. ही नियुक्ती राज्यातील वैद्यकीय क्षेत्रात कायदेशीर मार्गदर्शनासंबंधी महत्वपूर्ण ठरणार आहे. ॲड. महेश भताने यांचे नाव कायदेशीर क्षेत्रात प्रतिष्ठित आणि आदरणीय आहे. त्यांनी अनेक संवेदनशील प्रकरणे यशस्वीरित्या हाताळली असून त्यांच्या अनुभवाचा मोठा फायदा महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या कार्यक्षेत्रात होणार आहे.

ॲड. भताने हे कायद्याच्या क्षेत्रात तज्ज्ञ असून त्यांनी वैद्यकीय आणि सामाजिक क्षेत्रातही मोलाचे योगदान दिले आहे. ‘छाया फाऊंडेशन’ या सामाजिक संस्थेचे ते सहसंस्थापक आहेत. ही संस्था आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक न्याय क्षेत्रात काम करत असून, ॲड. भताने यांचे योगदान विशेषत्वाने सामाजिक न्यायासाठी आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेत कायदेशीर सल्लागार म्हणून काम करताना ॲड. महेश भताने यांच्यावर अनेक जबाबदाऱ्या असतील. वैद्यकीय व्यवसायाशी संबंधित कायदेशीर अडचणी, वैद्यकीय व्यावसायिकांना मार्गदर्शन, तसेच संबंधित कायद्यांमध्ये आवश्यक ते बदल सुचविण्याची जबाबदारी त्यांच्यावर राहणार आहे.




महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने ॲड. महेश भताने यांची निवड केल्यामुळे वैद्यकीय क्षेत्राला एक तज्ञ कायदेशीर सल्लागार मिळाला आहे, अशी भावना परिषदेत व्यक्त करण्यात येत आहे. ॲड. भताने यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या कायदेशीर प्रकरणांचा सखोल अभ्यास होऊन न्यायप्रविष्ट बाबींना नवा दृष्टिकोन प्राप्त होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. ॲड. महेश भताने यांनी या नव्या जबाबदारीसाठी आभार व्यक्त करताना सांगितले की, मी महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेचे आभार मानतो. माझ्या अनुभवाचा वापर करून वैद्यकीय व्यावसायिकांना न्याय मिळवून देण्याचा माझा सतत प्रयत्न राहील. ॲड. महेश भताने यांच्या नियुक्तीमुळे महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेचे कायदेशीर मार्गदर्शन क्षेत्र अधिक मजबूत होईल, अशी अपेक्षा सर्वत्र व्यक्त होत आहे.

# जमात-ए-इस्लामी हिंदचे मौलाना इलियास खान फलाही यांनी योगेंद्र यादव यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा केला निषेध

**मुंबई -** जमात-ए-इस्लामी हिंद, महाराष्ट्रचे अध्यक्ष मौलाना इलियास खान फलाही यांनी अकोला जिल्ह्यात महाराष्ट्र डेमोक्रॅटिक फोरम (MDF) आयोजित कार्यक्रमात भारत जोडो अभियानाचे राष्ट्रीय संयोजक आणि सामाजिक कार्यकर्ते योगेंद्र यादव यांच्यावर झालेल्या अनुचित आणि निंदनीय हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध केला आहे.

मौलाना इलियास खान फलाही यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, योगेंद्र यादव आणि उल्का महाजन यांच्यावरचा हल्ला हा लोकशाही मूल्यांवर आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गंभीर आघात आहे. हे आपल्या संविधानाचे आधारस्तंभ आहेत. ज्या सार्वजनिक मंचावर लोकांनी संविधानिक तत्त्वांवर चर्चा करण्यासाठी एकत्र यायचं होतं, तिथे अशी आक्रमक वर्तनं पाहणं अत्यंत चिंताजनक आहे. काही समाजकंटकांनी स्टेजवर घुसून माईक हिसकावणे, वक्त्यांना खाली उतरवणे आणि गाड्यांवर हल्ले करणे हे असहिष्णुतेच्या धोकादायक प्रवृत्तीचं प्रतीक आहे. ही फक्त व्यक्तींवरचीच नव्हे, तर मोकळ्या चर्चेच्या आत्म्यावरही झालेली आघात आहे, जी सशक्त लोकशाहीसाठी आवश्यक असते. खरी लोकशाही ही संवाद आणि चर्चेवर उभी राहते, धमक्या किंवा दडपशाहीवर नाही.



ते पुढे म्हणाले, हा हल्ला एकजूट आणि न्यायासाठी आवाज उठवणाऱ्या लोकांच्या आवाजाला दडपण्यासाठी योजलेला प्रयत्न वाटतो. वक्फ सुधारणा, मुस्लिम धार्मिक स्थळांवर हल्ले, जातीवर आधारित आरक्षण आणि इतर वादग्रस्त मुद्द्यांवर विचारपूर्वक चर्चा करूनच तोडगा काढता येईल. आम्ही सर्व न्यायप्रेमी नागरिक आणि सामाजिक संस्थांना पक्षीय राजकारणाच्या पलिकडे जाऊन अशा प्रकारांवर स्पष्ट निषेध नोंदवण्याचं आवाहन करतो आणि महाराष्ट्रात मोकळ्या अभिव्यक्तीसाठी अनुकूल वातावरण निर्माण ठेवण्याची जबाबदारी पार पाडायला सांगतो. जमात-ए-इस्लामी हिंद प्रशासनाला विनंती करते की या घटनेची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर तातडीने योग्य कारवाई करावी. दहशत आणि हिंसेला आपल्या लोकशाहीत जागा नाही. मतभेद कितीही तीव्र असले तरी त्यावर आदरयुक्त संवादातूनच तोडगा काढला पाहिजे. संविधानात दिलेल्या तत्त्वांची सुरक्षा सुनिश्चित करणे, नागरिकांना भीतीविना स्वतःचा आवाज उठवता यावा आणि एकतेचा व न्यायाचा मार्ग दृढ करणं हे आपलं सामूहिक कर्तव्य आहे.

## सोन्याची अंगठी व रोख रक्कम सह ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास

पोलीस सुत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार मुरलीधर गुलाबचंद पाली (वय ६८ वर्षे) व्यवसाय शेती मनुबाई जवळा ता. गेवराई जि. बीड यांना दिनांक २० सप्टेंबर रोजी रात्री ९:३० वा.च्या सुमारास जालना बस स्थानकावर दोन अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या हातात असलेली सोन्याची ५ ग्रॅमची अंगठी ज्याची अंदाजे किंमत ४० हजार रुपये व पाच हजार रुपये रोख रक्कम अशा ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल घेऊन दोन अज्ञात चोरटे फरार झाले. कलम ३१८(४), ३(५), नुसार सदर बाजार पोलिस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास वाघमारे हे करीत आहेत.

# पत्रकारितेतील बोगसगिरीला बसणार चाप!

## जिल्हा माहिती अधिकारी यांचा कौतुकास्पद निर्णय

**दीपक शेळके**

**जालना -** जिल्ह्यासह राज्यभरात पत्रकारितेच्या नावावर युट्युब चॅनल काढून पत्रकारिता करत मिरविणाऱ्यांना जिल्हा माहिती अधिकारी यांनी घेतलेल्या एका निर्णयामुळे चाप बसणार असल्याने पत्रकारांमधून जिल्हा माहिती अधिकाऱ्यांच्या कार्याचे कौतुक होत आहे.

विधानसभा निवडणुका नुकत्याच जाहीर झाल्या आहेत या निवडणुकीच्या अनुषंगाने पत्रकारांना मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर जाण्यासाठी तसेच मतमोजणीच्या दिवशी मतमोजणी केंद्रावर जाण्यासाठी पासेची व्यवस्था करण्यात येत आहे. प्रत्येक निवडणुकीच्या दरम्यान अशी व्यवस्था करण्यात येत असते. मात्र, यावर्षी जिल्हा माहिती अधिकारी अरुण सुर्यवंशी यांनी शासनमान्य यादीत सामाविष्ट वृत्तपत्रे तसेच विभागीय वृत्तपत्रे यांच्याच प्रतिनिधीना सदरील पासेस देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचे पत्रकारांमधून स्वागत होत असून यामुळे पत्रकारितेतील बोगसगिरीला चाप बसणार आहे.

प्रशासकिय पातळीवर जिल्हा माहिती अधिकारी श्री सुर्यवंशी यांनी निर्णय घेतला असला तरी प्रशासनातील पोलीस खाते यातून अद्याप सुटलेले नाहीत. काही पोलीस अधिकाऱ्यांकडून मोजक्या युट्युब चॅनलवाल्यांना तसेच काही पत्रकारांनाच वृत्त प्रसिद्धीस देण्याच्या अगोदर पुरविले जाते. त्याच बरोबर राजकीय नेते- पदाधिकाऱ्यांना देखील युट्युब चॅनल वाल्यांनी घेरले आहे. लागलीच स्टेटमेंट व तासाभरात युट्युबवर व्हायरल अशा तात्काळ मिळणाऱ्या सुविधेमुळे राजकीय नेते -पदाधिकारी भाळले गेले आहेत. त्यामुळे इमानेइतबारे पत्रकारिता करणाऱ्यांना त्यांचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. या राजकीय नेत्यांना झालेला घोळका कधी संपणार असा प्रश्न पत्रकारांना पडला आहे.

विविध प्रशासकीय कार्यालयांनाही यांचा त्रास होत आहे मात्र, सांगणार कुणाला आणि करणार काय? असा प्रश्न त्यांच्यासमोर असल्याने नाईलाजास्तव त्यांना हे सहन करावे लागत आहे. जिल्हा माहिती अधिकारी श्री सुर्यवंशी यांच्या निर्णयामुळे भविष्यात प्रशासकीय पातळीवर याचा कित्ता गिरविला गेल्यास पत्रकारितेतील बोगसगिरीला संपूर्णपणे चाप बसण्याची शक्यता आहे.

# सिरसवाडीत काँग्रेसला खिंडार, शेकडो कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश



**जालना । प्रतिनिधी -** विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर सिरसवाडी ता. जालना येथील काँग्रेसचे दत्तात्रय सातभाये यांनी पक्षाला सोडचिठ्ठी देऊन शिवसेना उपनेते, माजी मंत्री, अर्जुनराव खोतकर यांच्या विकासाभिमुख, समर्थ नेतृत्वावर विश्वास ठेवत असंख्य कार्यकर्त्यांसह शिवसेनेत प्रवेश केला.

अर्जुनराव खोतकर यांना काल शिवसेना पक्षातर्फे सलग आठव्यांदा जालना विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी जाहीर करण्यात आली. दर्शना निवासस्थानी शिवसेना पदाधिकारी आणि शिवसैनिकांचा जल्लोष सुरू असताना युवा सेनेचे तालुका सरचिटणीस, सिरसवाडीचे युवा नेतृत्व रवींद्र ढगे यांच्या मध्यस्थीने दत्तात्रय सातभाये यांच्या सह असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. त्यांचे माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांनी स्वागत केले.

यावेळी युवा सेना सचिव अभिमन्यू खोतकर ,शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, उपजिल्हाप्रमुख संतोष मोहिते ,गणेश सुपारकर ,मेघराज चौधरी, माजी नगरसेवक निखिल पगारे ,विशाल बनकर ,राहुल गवारे , रवींद्र ढगे, बाळासाहेब पाचरणे ,जनार्दन चौधरी, नारायण ढगे, रामभाऊ तांबे ,मनोहर ढगे, कैलास खळेकर, सुरेश तांबे ,ज्ञानेश्वर तांबे ,गजानन ढगे ,अशोक ढगे ,कैलास काजळकर ,रामनाथ काजळकर विलास ठोंबरे ,कैलास ढगे, गणेश हनवते, आदींची उपस्थिती होती.

पदावर नसतांना सुद्धा अर्जुनराव खोतकर यांनी सिरसवाडीला विकासाच्या बाबतीत झुकते माप दिले. रवींद्र ढगे यांच्या पाठपुराव्यामुळे वैयक्तिक लाभाच्या विहिरी, गावात अंतर्गत रस्ते ,महापुरुषांच्या पुतळ्यांचे सुशोभीकरण, पाणीपुरवठा योजना , अशी असंख्य विकास कामे करून दाखवली असून गत वेळेस पेक्षा यंदा खोतकर यांना अधिकचे मताधिक्य गावातून देणार असल्याचा निर्धार यावेळी कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.